# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# बाळासाहेब देसाई कॉलेजची प्रवेश प्रक्रिया सुरू

**पाटण :** राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. या वर्षापासून राज्य शासनाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या अकरावीचे संपूर्ण राज्यातील सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान, वाणिज्य, कला शाखेचे प्रवेश हे ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. तर एमसीव्हीसी (एचएससी व्होकेशनल) शाखेचे प्रवेश हे जुन्या पद्धतीप्रमाणे म्हणजेच थेट पद्धतीने होणार असल्याची माहिती बाळासाहेब देसाई महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे यांनी दिली.

महाविद्यालयात चार शाखा असून यामध्ये विज्ञान, कला, वाणिज्य व एमसीव्हीसी शाखांचा समावेश आहे. ३० विविध शाखांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. महाविद्यालयात कृषी गटातील हॉर्टिकल्चर, अभियांत्रिकी गटातील इलेक्ट्रिक टेक्नॉलॉजी, कॉमर्स गटातील बँकिंग फायनान्शियल सर्व्हिसेस अँड इन्शुरन्स हे अभ्यासक्रम शिकवले जातात. अभ्यासक्रम रोजगाराभिमुख असून बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी प्रवेश दिला जातो. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बी.ए., बीकॉम, बी.एसी, बी.सी.ए, बीकॉम आयटी, हॉटेल मॅनेजमेंट, प्रवेश मिळतो.

वरिष्ठ विभागाकडील बी.ए, बी.कॉम, बी.एससी., एम.ए., एम.कॉम., एम.एससी., बीकॉम आय. टी., या वर्गाचे प्रवेशदेखील सुरू झाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. कळंत्रे यांनी दिली